सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २४ वे • अंक ३०६ • शुक्रवार दि.४ सप्टेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## खासदार,आमदारांच्या घरासमोर पोलीस बंदोबस्त वाढविला

नांदेड/प्रतिनिधी-मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर खासदार व आमदारांच्या घरासमोर पोलीस बंदोबस्त आज वाढविण्यात आला आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाजाच्यावतीने आज (शुक्रवार) नांदेड बंदचे आवाहन करण्यात आले होते. राज कॉर्नर येथुन भव्य मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात सत्ताधारी शिवसेनेच्या दोन आमदारा विरोधात मराठा आंदोलनकर्त्यांनी घोषणाबाजी केली. आंदोलनकर्त्यांच्या आक्रमक पवित्र्यामुळे दोन्ही आमदार वाहनात बसून निघून गेले. त्यानंतर पोलीस प्रशासनाने नांदेड शहरात वास्तव्यास असलेल्या खासदार, आमदारांच्या निवासस्थानासमोर पोलीस बंदोबस्त वाढविला आहे. आंदोलनकर्त्यांच्या हालचालींवर पोलीस प्रशासन लक्ष ठेवून आहेत.

# नांदेड बंदला उत्स्फुर्त प्रतिसाद;जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा

नांदेड/प्रतिनिधी-मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाजाच्यावतीने पुकारलेल्या नांदेड बंदला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला आहे. शहरातील बाजारपेठ बंद होती. नायगाव, मुदखेड, देगलूर, किनवट या ठिकाणीही बंद पाळण्यात आला आहे.

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी व इतर मागण्यांसाठी आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे गेल्या सात दिवसापासून उपोषण सुरु केले आहे. जरांगे यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ गेल्या दोन दिवसांपासून राज्यात ठिकठिकाणी आंदोलने सुरु आहेत. सकल मराठा समाजाच्यावतीने मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी शुक्रवार दि.४ सप्टेंबर रोजी नांदेड बंदचे आवाहन करण्यात आले होते. या बंदला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला असून खाजगी कोचिंग क्लासेस व बहुतांश शाळा बंद होत्या. व्यापाऱ्यांनीही आपली दुकाने बंद ठेवून बंदमध्ये सहभाग नोंदविला आहे. शुक्रवारी सकाळी शहरातील राज कॉर्नर येथुन मराठा समाजाच्या मोर्चाला प्रारंभ झाला. सदरील मोर्चा श्रीनगर, आयटीआय,







शिवाजीनगर, कलामंदीर, वजिराबाद चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. यावेळी सकल मराठा समाजातील पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची भेट घेवून मागण्यांचे निवेदन दिले. मालेगाव रोड, तरोडा नाका, वर्कशॉप, श्रीनगर, आयटीआय, वजिराबाद, जुना मोंढा, नवा मोंढा तसेच सिडको-हडको या भागातील दुकाने बंद होती. बंद दरम्यान कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये यासाठी पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. नांदेड-हैद्राबाद महामार्गावरील किकी येथे सकल मराठा समाजबांधवांनी रास्ता रोको आंदोलन केल्याने काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. किनवट, देगलूर, नायगाव, मुदखेड या ठिकाणी बंद पाळण्यात आला आहे.





नांदेड एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष तथा मा.खा.व्यंकटेश काब्दे यांच्या वाढदिवसानिमित्त नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या पीपल्स कॉलेजमध्ये डॉ.काब्दे यांच्या कवितांचे वाचन तर सायन्स कॉलेज मध्ये शंभर केशर आंब्यांची झाडे लावून त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सी.ए.डॉ.प्रविण पाटील, सहसचिव ॲड.प्रदीप नागापूरकर, प्राचार्य डॉ.लक्ष्मण शिंदे, प्राचार्य विकास सुकाळे, उपप्राचार्य अरुणा शुक्ला, उपप्राचार्य विशाल पतंगे, प्रा.एकनाथ खिल्लारे, प्रा.यशपाल भिंगे, दै.गाववालाचे संपादक विजय दगडू, प्रा.विलास वडजे, प्रा.विजयानंद कदम, डॉ.मुकुंद कवडे, प्रा.कल्पना जाधव, रोहिदास आडे, राहुल गवारे आदी दिसत आहेत.

## भावना दुखावल्याप्रकरणी बापटांविरोधात गणेश मंडळे तक्रार करणार

पुणे:गणेशोत्सवातील ध्वनीप्रदूषण आणि डीजेच्या मोठ्या आवाजाला विरोध करणारे सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट यांच्या वक्तव्याविरोधात काही गणेश मंडळे पोलिसांकडे तक्रार दाखल करणार असल्याची माहिती समोर आली आहे. बापट यांच्या वक्तव्यामुळे भावना दुखावल्या




असून दोन समाजांत तेढ निर्माण होऊन सार्वजनिक शांततेला बाधा निर्माण झाल्याचा आरोप मंडळांकडून करण्यात येत आहे.

या आरोपांवर प्रतिक्रिया देताना बापट यांनी, भावना म्हणजे छाती, डोकँनाही दुखायला. भावना ही दुखायची गोष्ट नाही, असे वक्तव्य केले. समोरच्या भूमिकेचा तार्किक प्रतिवाद करता येत नसल्याने भावना दुखावल्याचा कांगावा केला पान ४ वर

# ओबीसींच्या बळावरच सत्तेची खुर्ची,विसरु नका

## ना.भुजबळांचा महायुतीला घरचा आहेर



मुंबई/प्रतिनिधी-महायुती सरकारच्या सत्तास्थापनेत ओबीसी समाजाने दिलेले योगदान विसरता कामा नये, असा थेट इशारा मंत्री छगन भुजबळ यांनी महायुतीच्या नेत्यांना दिला. ओबीसी समाजाच्या पाठिंब्यामुळेच महायुतीला सत्तेपर्यंत पोहोचण्यास मोठी मदत झाली असून, त्यामुळे ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारने सावध भूमिका घेणे आवश्यक असल्याचे भुजबळ यांनी स्पष्ट केले.

मराठा आरक्षणाच्या मागणीवरून राज्यात पुन्हा वातावरण तापले असताना भुजबळ यांच्या या भूमिकेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मराठा समाजाच्या मागण्यांवर निर्णय घेताना ओबीसी समाजाच्या आरक्षणाला कोणत्याही परिस्थितीत धक्का लागू नये, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. महायुतीला सत्तेत आणण्यासाठी ओबीसी समाजाने मोठा हातभार लावला आहे. त्यामुळे सरकारने ओबीसी समाजाच्या हिताचा विचार करणे गरजेचे आहे. आरक्षणाच्या प्रश्नावर कोणताही निर्णय घेताना ओबीसींच्या हक्कांवर गदा येणार नाही, याची काळजी सरकारने घ्यावी, असे भुजबळ यांनी स्पष्ट केले.मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून सरकारकडून सुरू असलेल्या हालचालींच्या पार्श्वभूमीवर भुजबळ यांनी व्यक्त केलेली नाराजी ही महायुतीसाठी महत्त्वाची मानली जात आहे. एका बाजूला मराठा समाजाच्या मागण्यांवर तोडगा काढण्याचे सरकारचे प्रयत्न सुरू असताना दुसऱ्या बाजूला ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणासाठी भुजबळ यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.आरक्षणाचा प्रश्न हाताळताना कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही आणि विद्यमान ओबीसी आरक्षण सुरक्षित राहील, याबाबत सरकारने स्पष्टता आणणे आवश्यक असल्याचेही भुजबळ यांनी सूचित केले. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर सरकार नेमकी कोणती भूमिका घेते आणि ओबीसी समाजाच्या आरक्षणाबाबत कोणती हमी दिली जाते, याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# आश्रमशाळेतील आणखी एका विद्यार्थिनीचा मृत्यू


## प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह;शवविच्छेदन अहवालाची प्रतीक्षा

नाशिक: कळवण तालुक्यातील विसापूर येथील शासकीय माध्यमिक आश्रमशाळेतील आठवर्षीय विद्यार्थिनीचा तापीच्या उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. सृष्टी सूर्यवंशी असे मृत विद्यार्थिनीचे नाव असून, तिच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेनंतर पालकांकडून आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्य व्यवस्थेबाबत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.




गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील जपतलाई आश्रमशाळेत सर्पदंशाच्या घटनेत तीन विद्यार्थिनींचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच सृष्टी सूर्यवंशी ही सटाणा तालुक्यातील गोळवाड येथील रहिवासी असून, कळवण तालुक्यातील विसापूर येथील शासकीय माध्यमिक आश्रमशाळेत इयत्ता दुसरीत शिक्षण घेत होती. गुरुवारी, ३ सप्टेंबर रोजी सृष्टीला ताप आणि उलट्यांचा त्रास सुरू झाला. त्यानंतर तिला प्राथमिक उपचारासाठी मोकमभणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर तिला पुन्हा विसापूर येथील आश्रमशाळेत आणण्यात आले.मात्र, सृष्टीची प्रकृती पुन्हा खालावल्याने शुक्रवारी, ४ सप्टेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास तिला कळवण उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी रात्री २ वाजून २७ मिनिटांनी तिची तपासणी केली असता ती मृतावस्थेत असल्याचे स्पष्ट झाले. या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आल्यानंतर कळवण पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.दरम्यान, सृष्टीची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आश्रमशाळा प्रशासनाने मध्यरात्री दीड वाजण्याच्या सुमारास पालकांना दिल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे सृष्टी आजारी असल्याची माहिती शिक्षक किंवा संबंधित कर्मचाऱ्यांनी पालकांना वेळेत का दिली नाही, असा पान ४ वर

माजी खासदार,
नांदेड एज्युकेशन सोसायटी,
नांदेडचे माजी अध्यक्ष व
सुप्रसिध्द हृदयरोग तज्ज्ञ
मा.डॉ.
व्यंकटेश काब्दे साहेब
यांना ८७ व्या वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा





✻ शुभेच्छुक ✻



सीए.डॉ. प्रविण पाटील – अध्यक्ष
ॲड. प्रफुल्ल अग्रवाल – उपाध्यक्ष
प्रा.सौ. श्यामल पत्की – सचिव
ॲड. प्रदीप नागापूरकर – सहसचिव

नांदेड एज्युकेशन सोसायटी, नांदेड

कार्यकारिणी सदस्य : नौनिहालसिंघ जहागीरदार, ॲड.चिरंजीलाल दागडिया, डॉ.उमेश भालेराव, कु.शांभवी साले, डॉ.यशपाल भिंगे, श्री.विलास वडजे, डॉ.अविनाश शिंदे, श्री.एकनाथ खिल्लारे, श्री.राहुल गोरे, डॉ.लक्ष्मण शिंदे, डॉ.विकास सुकाळे, श्री.प्रशांत चौधरी



डॉ.विकास सुकाळे – प्राचार्य
डॉ.विशाल पतंगे – उपप्राचार्य
डॉ.यशपाल भिंगे
श्री.विलास वडजे
डॉ.राजेश सोनकांबळे
डॉ.बाजीराव वडवळे




डॉ. भगवान जाधव
डॉ. मुकुंद कवडे
डॉ. संदीप गायकवाड
श्री.विजयानंद कदम
श्री.रोहिदास आडे
श्री. राहुल गवारे

व सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, पीपल्स कॉलेज, नांदेड

# बापट यांच्या मागणीला 'चापट'

पुण्यात गणेशोत्सवातील कर्णकर्कश डीजेला विरोध करणारे सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट यांच्यावर माध्यमांसमोर हल्ला होणे ही केवळ एका व्यक्तीला झालेली मारहाण नाही; ती मतभिन्नतेला दिलेले असहिष्णू उत्तर आहे. एखाद्याची भूमिका चुकीची वाटत असेल तर तिचा प्रतिवाद करता येतो, चर्चा करता येते. पण मुद्द्याला उत्तर देता येत नसेल म्हणून हात उगारला जात असेल, तर हा प्रकार लोकशाहीपेक्षा मनगटशाहीला बळ देणारा ठरतो. विशेष म्हणजे बापट यांनी मांडलेला डीजेविरोधाचा मुद्दा काही नवा नाही. गणेशोत्सव सांस्कृतिक पद्धतीने साजरा करावा आणि डीजेच्या अतिरेकापासून दूर राहावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही केले आहे. भाजपच्या खा. मेधा कुलकर्णी यांनी देखील डीजेमुक्त गणेशोत्सवाची भूमिका मांडली आहे. त्यामुळे डीजेला विरोध करणे म्हणजे गणेशोत्सवाला विरोध करणे, असा सरळसोट निष्कर्ष काढणे वस्तुस्थितीचा विपर्यास आहे.याहून महत्त्वाचे म्हणजे हा प्रश्न केवळ धार्मिक भावनेचा नाही. ध्वनीप्रदूषण हा कायद्याचा आणि सार्वजनिक आरोग्याचा विषय आहे. ध्वनीची मर्यादा, ध्वनिक्षेपकाच्या वापराची वेळ आणि सार्वजनिक ठिकाणी त्यासंबंधीचे नियम सरकारने निश्चित केले आहेत. धार्मिक उत्सवांनाही हे नियम लागू आहेत. सर्वोच्च न्यायालयानेही धार्मिक स्वातंत्र्याचा अर्थ इतर नागरिकांच्या शांततेवर अमर्याद अतिक्रमण करण्याचा अधिकार असा होत नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे डीजेच्या आवाजावर प्रश्न उपस्थित करणाऱ्याला धर्मविरोधी ठरवणे हा प्रश्नाला भावनिक वळण देण्याचा प्रकार आहे. या वादात आता बापट नास्तिक असल्याचा मुद्दा पुढे केला जात आहे. ते नास्तिक असतील तर असतील; पण नास्तिक असणे हा गुन्हा नाही. भारतीय संविधान नागरिकाला विचार, विवेक आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य देते. एखाद्याला देवावर श्रद्धा ठेवण्याचा अधिकार आहे, तसाच श्रद्धा न ठेवण्याचाही. धार्मिक प्रथा, परंपरा किंवा सार्वजनिक उत्सवांवर प्रश्न उपस्थित करण्याचा अधिकारही त्यातूनच येतो. एखाद्याला नास्तिक म्हणून हिणवणे हा वैचारिक प्रतिवाद नव्हे. बापट यांनी आषाढीच्या दिंड्यांबाबतही आक्षेप घेतल्याचा दावा केला जात आहे. एखाद्या धार्मिक परंपरेशी असहमती असणे आणि त्या परंपरेचा अवमान करणे यात फरक आहे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे एखाद्याच्या श्रद्धा-अश्रद्धेचा निर्णय घेऊन त्याला शिक्षा करण्याचा अधिकार समाजातील कोणत्याही व्यक्तीला नाही. गुन्हा झाला असेल तर कायदा तपासेल; नास्तिकतेची शिक्षा देण्यासाठी कोणतीही समांतर न्यायव्यवस्था संविधानाने निर्माण केलेली नाही.खरा धोका इथेच आहे. आपल्या भूमिकेशी सहमत नसलेल्याला धर्मविरोधी, संस्कृतीविरोधी किंवा नास्तिक अशी लेबले लावून त्याला सार्वजनिक चर्चेतून बाद करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. सत्तेच्या जवळ असलेल्यांकडून अशा आरोपांना राजकीय संरक्षण मिळू लागले तर परिस्थिती आणखी गंभीर होते. लोकशाहीत बहुमताला सत्ता मिळते; बहुमताला दुसऱ्याच्या विवेकावर मालकी मिळत नाही. गणेशोत्सवाच्या मूळ संकल्पनेकडे पाहिले तरी हा विरोधाभास प्रकर्षाने जाणवतो. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला सामाजिक आणि राष्ट्रीय स्वरूप दिले. लोकांना एकत्र आणणे, जनजागृती करणे, सार्वजनिक प्रश्नांवर चर्चा घडवणे आणि समाजात चेतना निर्माण करणे हा त्यामागचा व्यापक हेतू होता. आज त्याच उत्सवाची ओळख काही ठिकाणी डीजेचा आवाज, प्रचंड रोषणाई आणि शक्तिप्रदर्शनाशी जोडली जात असेल तर उत्सवाच्या मूळ उद्देशाचे आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे.गणेशोत्सवाचा उत्साह कमी करण्याची गरज नाही; उत्साहाला शिस्त देण्याची गरज आहे. भक्तीला आवाजाची मर्यादा असू शकते, पण तिचे महत्त्व त्यामुळे कमी होत नाही. एका मंडळाच्या आनंदासाठी परिसरातील ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, रुग्ण किंवा सामान्य नागरिकांच्या शांततेचा अधिकार हिरावून घेता येत नाही. त्याचप्रमाणे शांततेची मागणी करणाऱ्याला धार्मिक भावना दुखावल्याच्या नावाखाली गप्पही करता येणार नाही. या संपूर्ण प्रकरणात प्रशासनाची भूमिकाही स्पष्ट असली पाहिजे. नियम सर्वांसाठी समान असावेत. डीजे असो, ध्वनिक्षेपक असो किंवा कोणताही सार्वजनिक कार्यक्रम. कायदा मोडला तर कारवाई झाली पाहिजे आणि कायदा हातात घेतला तर त्याहून कठोर कारवाई झाली पाहिजे. राजकीय ओळख, धार्मिक भावना किंवा व्यक्तीची श्रद्धा-अश्रद्धा यानुसार कायद्याचे माप बदलता कामा नये.बापटांची भूमिका योग्य आहे की अयोग्य, हा स्वतंत्र चर्चेचा विषय आहे. पण त्यांना ती मांडण्याचा अधिकार आहे, हे मान्य करावेच लागेल. विचाराला विचाराने उत्तर देणे ही महाराष्ट्राची परंपरा आहे; चापटीने नव्हे. नास्तिक असणे गुन्हा नाही. डीजेला विरोध करणे गुन्हा नाही. धार्मिक परंपरेवर प्रश्न उपस्थित करणेही गुन्हा नाही. मात्र कायदा हातात घेणे हा गंभीर प्रकार आहे. त्यामुळे बापट यांच्या गालावर बसलेली चापट ही त्यांच्या मताला दिलेले उत्तर समजले, तर उद्या प्रत्येक असहमत आवाजासाठी चापट तयार ठेवावी लागेल. महाराष्ट्राला ही वाट नको. गणेशोत्सवाची प्रतिष्ठा डीजेच्या डेसिबलमध्ये नाही, तर त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक जाणिवेत आहे. आणि लोकशाहीची ताकद सर्वजण एकसारखे विचार करण्यात नाही, तर वेगवेगळे विचार मांडण्याचे स्वातंत्र्य सुरक्षित ठेवण्यात आहे.

# राजकारण, समाजकारणातील 'प्रेरणास्थान'



आज राजकारण, समाजकारण म्हटले की डोळ्यांसमोर येते ती पैसा, जात, धर्म, सत्तेची समीकरणे आणि पक्षांतरांची गणिते. निवडणूक जिंकण्यासाठी पैसा किती खर्च केला, कोणत्या समाजाचे किती मतदार आपल्या बाजूला आहेत आणि सत्तेच्या समीकरणात आपला फायदा किती याभोवती राजकारण, समाजकारण फिरताना दिसते. अशा काळात मात्र काही व्यक्तिमत्त्वे राजकारणाकडे वेगळ्या नजरेने पाहण्याची प्रेरणा देतात. नांदेडच्या राजकीय आणि सामाजिक जीवनातील डॉ. व्यंकटेश काब्दे हे असेच एक प्रेरणास्थान.

राजकारणाचा अर्थ केवळ सत्ता मिळवणे असा कधीच नव्हता. लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडणे, अन्यायाविरुद्ध उभे राहणे आणि विकासासाठी संघर्ष करणे हा राजकारणाचा मूळ गाभा होता. आज तो गाभा हरवत चालला आहे. त्यामुळेच जुन्या पिढीतील राजकारण्यांकडे पाहिले की राजकारण किती बदलले आहे, याची प्रकर्षाने जाणीव होते.एक काळ असा होता की सामान्य कष्टकरी माणूसही अगदी मर्यादित खर्चात निवडणूक लढवून जिंकू शकत होता. मतदार उमेदवाराच्या खिशातील पैसा किंवा जातीय समीकरण पाहण्यापेक्षा त्याची भूमिका, पक्षाची विचारधारा, सार्वजनिक जीवनातील चारित्र्य आणि समाजासाठी त्याने केलेले काम यांचा विचार करीत. आज निवडणुकीच्या राजकारणात या मूल्यांना दुय्यम स्थान मिळाले आहे.

या बदलत्या राजकारणाच्या प्रवाहात डॉ. काब्दे यांचे राजकीय जीवन विशेष ठरते.१९९० च्या दशकात लोकसभेत पोहोचलेला हा नेता सत्तेच्या मोहापेक्षा विचारांशी निष्ठा राखणारा होता. राजकीय परिस्थिती बदलली म्हणून आपली भूमिका बदलायची, सत्तेच्या जवळ जाण्यासाठी तडजोड करायची किंवा एखाद्या पदाच्या आमिषाला बळी पडायचे, हा मार्ग त्यांनी स्वीकारला नाही.राजकारणात पराभव होणे ही मोठी गोष्ट नाही; पराभवानंतर आपण कोणता मार्ग स्वीकारतो, हे अधिक महत्त्वाचे असते. डॉ.काब्दे यांचा निवडणुकीत पराभव झाला; पण त्यांचे समाजकारण संपले नाही. उलट निवडणुकीच्या राजकारणातून बाजूला झाल्यानंतरही मराठवाड्याच्या विकासाचे प्रश्न, रेल्वेचा प्रश्न, शिक्षण आणि सामाजिक चळवळी यासाठी त्यांचा संघर्ष सुरूच राहिला. पद गेले, सत्ता गेली; पण समाजाशी असलेली नाळ तुटली नाही.हीच बाब त्यांना आजच्या राजकारणापेक्षा वेगळे ठरवते.

**प्रदीप नागापूरकर**
नांदेड.

नांदेडच्या राजकीय इतिहासात डॉ.काब्दे यांच्याबरोबरच कॉ.व्ही.डी. देशपांडे, सदाशिवराव पाटील, कॉ. अनंतराव नागापूरकर, कॉ.गोपाळराव कुर्तडीकर, सुधाकरराव डोईफोडे अशा अनेकांची नावे आदराने घेतली जातात. यांच्यापैकी अनेकांना निवडणुकीत मतदारांनी नेहमीच विजय दिला असे नाही; पण मतपेटीतला पराभव आणि जनमानसातील पराभव या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. निवडणूक हरलेले हे नेते लोकांच्या मनातून कधीच हरले नाहीत. डॉ. काब्दे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची वैद्यकीय सेवा. डॉक्टरकी हा व्यवसाय असला तरी त्यांनी त्याला केवळ आर्थिक उत्पन्नाचे साधन मानले नाही. गरजू रुग्णांना अत्यल्प खर्चात, तर काहींना मोफत उपचार देण्याची त्यांची वृत्ती आजही कायम आहे. राजकारणातील समाजसेवा आणि वैद्यकीय सेवेतील माणुसकी यांचा सुंदर संगम त्यांच्या जीवनात दिसतो.

आजच्या राजकारणात 'मला काय मिळणार?' हा प्रश्न मोठा झाला आहे. त्याच्या उलट डॉ. काब्दे यांच्या राजकीय विचारांचा केंद्रबिंदू 'समाजाला काय मिळणार?' हा होता. ही दोन वाक्ये आजच्या आणि त्या काळच्या राजकारणातील फरक स्पष्ट करण्यासाठी पुरेशी आहेत. राजकारणाला प्रेरणास्थानांची गरज असते. प्रेरणास्थान म्हणजे केवळ निवडणुकीत अनेक वेळा विजयी झालेला नेता नव्हे. पराभवानंतरही आपल्या विचारांवर ठाम राहणारा, पद नसतानाही समाजासाठी काम करणारा आणि सत्तेपेक्षा मूल्यांना महत्त्व देणारा माणूस हा खरा राजकीय आदर्श असतो.आज राजकारणाबद्दल तरुणांच्या मनात निर्माण होणारी निराशा दूर करायची असेल, तर अशा व्यक्तिमत्त्वांचा जीवनप्रवास नव्या पिढीसमोर यायला हवा. कारण राजकारण बदलण्याची सुरुवात केवळ कायदे बदलण्यापासून होत नाही; ती राजकारणाकडे पाहण्याची दृष्टी बदलण्यापासून होते.

डॉ. व्यंकटेश काब्दे यांचे जीवन त्या बदललेल्या दृष्टीचा एक जिवंत संदर्भ आहे. सत्ता आली म्हणून मोठे होणे सोपे असते; सत्ता गेल्यानंतरही लोकांच्या मनात मोठे राहणे ही खरी कसोटी असते. त्या कसोटीवर यशस्वी ठरलेली माणसेच राजकारणाची खरी प्रेरणास्थाने आणि पुढच्या पिढीची आदर्श व्यक्तिमत्त्वे ठरतात.आज डॉ. व्यंकटेश काब्दे यांचा वाढदिवस. त्यांच्या प्रदीर्घ सार्वजनिक जीवनातील विचारांची निष्ठा, समाजाशी असलेली बांधिलकी आणि माणुसकीची सेवा अशीच अखंड सुरू राहो. त्यांना दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि निरामय जीवन लाभावे, तसेच त्यांच्या अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा लाभ समाजाला दीर्घकाळ मिळत राहावा, हीच वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक सदिच्छा!

# डॉ.व्यंकटेश काब्दे:मातीशी नाळ जपणाऱ्या कर्तृत्वाची कहाणी

काही माणसे पदामुळे मोठी होतात; काहींच्या पदांना त्यांच्या कर्तृत्वामुळे मोठेपण लाभते. मात्र, काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की पदे, पुरस्कार आणि प्रसिद्धी यांच्याही पलीकडे त्यांची ओळख निर्माण होते. त्यांच्या आयुष्याचा केंद्रबिंदू असतो माणूस आणि समाज. माजी खासदार, ज्येष्ठ हृदयरोगतज्ज्ञ, समाजवादी विचारांचे पुरस्कर्ते, शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते आणि संवेदनशील कवी डॉ. व्यंकटेश काब्दे हे अशाच बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे उदाहरण.

गरीबीच्या सावलीतून सुरू झालेला त्यांचा प्रवास वैद्यकीय क्षेत्रातील उच्च शिक्षणापासून अमेरिकेतील प्रतिष्ठित रुग्णालयांपर्यंत पोहोचला. मात्र, सुखसोयींचे जग मागे सोडून त्यांनी मायभूमीची वाट धरली. परतल्यानंतर त्यांनी वैद्यकीय सेवा केवळ व्यवसाय म्हणून नव्हे, तर सामाजिक बांधिलकी म्हणून स्वीकारली. त्याचबरोबर शिक्षण, समाजकारण, राजकारण आणि मराठवाड्याच्या विकासाच्या प्रश्नांशी आपले नाते घट्ट केले. ४ सप्टेंबर १९४० रोजी देगलूर येथे एका सामान्य कुटुंबात डॉ. काब्दे यांचा जन्म झाला. आई-वडील निरक्षर. वडिलांचा पारंपरिक व्यवसाय. लमाणी तांड्यांवर कापड रंगवून आणि विकून संसाराचा गाडा चालायचा. डोक्यावर कापडाचा गठ्ठा घेऊन तांड्यांवर जाण्यापासून सुरू झालेला हा प्रवास पुढे बैलाच्या मदतीने व्यवसाय वाढवण्यापर्यंत पोहोचला. घरातील प्रत्येक जण या कामात हातभार लावत असे. तिसरी-चौथीत असतानाच वाचनाची गोडी लागलेल्या डॉ.व्यंकटेश काब्दे यांनी गल्लीतील मुलांसाठी मोफत वाचनालय सुरू केले. पुढे हस्तलिखित नियतकालिकही काढले. वक्तृत्वाची आवड जोपासताना हैदराबादमधील स्पर्धेत त्यांनी उल्लेखनीय यश मिळविले. शिक्षणासाठी हैदराबाद गाठले तेव्हा परिस्थिती अत्यंत प्रतिकूल होती. मर्यादित पैशांत शिक्षण, निवास आणि उदरनिर्वाह सांभाळत त्यांनी दहावीच्या परीक्षेत तत्कालीन हैदराबाद स्टेटच्या गुणवत्ता यादीत तिसरे स्थान मिळविले. हा केवळ शैक्षणिक यशाचा टप्पा नव्हता; तो त्यांच्या जिद्दीचा पहिला सार्वजनिक दाखला होता.

छत्रपती संभाजीनगरच्या (पूर्वीचे औरंगाबाद) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएसचे शिक्षण घेताना विद्यापीठात प्रथम येण्याचा मान त्यांनी मिळविला. त्यानंतर चंदीगड येथून एम.डी. केले. वैद्यकीय क्षेत्रातील पुढील उच्च शिक्षणासाठी एमएएमएस, एफएसीसी, एफआरसीपी आणि एफसीसीपी यांसारख्या उच्च पात्रता त्यांनी संपादन केल्या. शिक्षण आणि कौशल्याच्या जोरावर त्यांची वाटचाल अमेरिकेपर्यंत पोहोचली. शिकागोतील गरिब वस्तीत त्यांनी फिजिशियन आणि मेडिकल डायरेक्टर म्हणून काम केले. इलिनॉय सेंट्रल कम्युनिटी हॉस्पिटलमध्ये आयसीयू डायरेक्टर, फिजिशियन आणि हृदयरोगतज्ज्ञ म्हणूनही जबाबदारी सांभाळली. मात्र परदेशातील वैभवाने त्यांच्या मनावर मोहिनी घातली नाही. मायभूमीची हाक त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. आपल्या माणसांना, आपल्या मातीतल्या रुग्णांना आपल्या ज्ञानाची अधिक गरज आहे, ही जाणीव त्यांना होती. त्यामुळे १९७७ मध्ये त्यांनी भारतात परतण्याचा निर्णय घेतला.नांदेडला परतल्यानंतर त्यांचे आयुष्यच रुग्णसेवेला समर्पित झाले. हजारो रुग्णांची तपासणी, उपचार आणि शस्त्रक्रिया करताना त्यांनी वैद्यकीय सेवा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. रुग्णसेवा मंडळ, देगलूर तसेच विविध सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून त्यांनी मोठ्या प्रमाणावर आरोग्यसेवा उपलब्ध करून दिली. दाभड आरोग्य केंद्रातून हजारो रुग्णांची तपासणी झाली.

नांदेडमध्ये हृदयविकारावरील उपचारांना आधुनिक दिशा देताना त्यांनी १९८० मध्ये पहिली हृदयशस्त्रक्रिया घडवून आणण्यासाठी पुढाकार घेतला. पुढे नांदेडमध्ये हृदयविकाराच्या उपचारांची सुविधा विस्तारत गेली. वैद्यकीय सेवा देतानाच त्यांनी हृदयरोगावरील संशोधनही केले. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिकांत संशोधनपर लेख प्रकाशित झाले, परिषदांमध्ये त्यांचे सादरीकरण झाले. पण त्यांच्या दृष्टीने प्रत्येक रुग्ण हा केवळ केस नव्हता. तो एक माणूस होता. डॉ. काब्दे यांची सामाजिक बांधिलकी रुग्णालयाच्या चार भिंतींत कधीच बंदिस्त राहिली नाही. कळमनुरी परिसरात कयाधू ग्रामविकास प्रकल्पाच्या माध्यमातून महिला आणि बालकल्याणाचे विविध उपक्रम राबविण्यात त्यांनी पुढाकार घेतला. पाणलोट क्षेत्र विकास, महिला बचत गट आणि महिला



सबलीकरणाच्या कामातून ग्रामीण भागातील सामाजिक परिवर्तनाला हातभार लावला. दुष्काळाच्या काळात मराठवाड्यात दौरे करून त्यांनी परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेतला आणि शासनाने दुष्काळग्रस्तांना मदत करावी यासाठी पाठपुरावा केला. नाम फाऊंडेशनचे सल्लागार म्हणूनही त्यांनी काम केले. त्यांच्या समाजकारणाचा एक महत्त्वाचा धागा म्हणजे मराठवाड्याच्या प्रश्नांविषयीची अस्वस्थता. पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ यांच्या विचारांचा प्रभाव डॉ. काब्दे यांच्या कार्यावर स्पष्टपणे दिसतो. मराठवाड्याचा अनुशेष, पाणी, सिंचन, उद्योग, रस्ते, शेती आणि आरोग्य यांसारख्या प्रश्नांना त्यांनी सातत्याने वाचा फोडली. मराठवाडा जनता विकास परिषदेच्या माध्यमातून त्यांनी या प्रश्नांना संघटित व्यासपीठ दिले. पाणी प्रश्नावर परिषदा घेतल्या, न्यायालयीन लढे दिले आणि शासनदरबारी सातत्याने पाठपुरावा केला.

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या मागणीसाठीच्या आंदोलनातही त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. नांदेडमधील विविध विकासकामांपासून लेंडी, बाभळी, इसापूर आणि मनार प्रकल्पांपर्यंत अनेक प्रश्नांवर त्यांची भूमिका आजही तितकीच आग्रही आहे. १९८९ ची लोकसभा निवडणूक डॉ. काब्दे यांच्या राजकीय जीवनातील महत्त्वाचा अध्याय ठरली. नांदेड मतदारसंघातून जनता दलाच्या उमेदवारीवर ते निवडून आले आणि त्यांनी तत्कालीन काँग्रेसचे उमेदवार अशोक चव्हाण यांचा पराभव केला. त्या वेळचा निकाल राज्याच्या राजकीय वर्तुळातही चर्चेचा विषय ठरला. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ समाजवादी नेते गंगाधर पटने यांनी आपल्या लेखनातून काही आठवणी आणि त्या वेळच्या राजकीय घडामोडी मांडल्या आहेत. त्यांच्या मते, डॉ. काब्दे यांना उमेदवारी देण्यामागे तत्कालीन राजकीय समीकरणांची भूमिका होती. निवडणुकीत मात्र मतदारांनी वेगळाच कौल दिला आणि डॉ. काब्दे लोकसभेत पोहोचले. लोकसभेतील त्यांचा कार्यकाळ केवळ राजकीय उपस्थितीपुरता मर्यादित नव्हता. आपल्या मतदारसंघातील आणि मराठवाड्यातील प्रश्न संसदेत मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला.डॉ. काब्दे यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा अध्याय म्हणजे नांदेड एज्युकेशन सोसायटी. हैदराबाद मुक्तिसंग्रामातील थोर स्वातंत्र्य सेनानी पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांनी स्थापन केलेल्या आणि गोविंदभाई श्रॉफ यांनी जोपासलेल्या शैक्षणिक विचारांचा वारसा २००२ मध्ये नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष झाल्यानंतर त्यांनी पुढे तसाच नेला. नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या नेतृत्वाची जबाबदारी सांभाळताना शिक्षणाचे व्यापारीकरण, बाजारीकरण होऊ नये, गुणवत्तेला आणि मूल्यांना प्राधान्य मिळावे, ही भूमिका त्यांनी कायम जपली.

**डॉ.विनोद चव्हाण**
पीपल्स कॉलेज,नांदेड.

पीपल्स कॉलेज आणि सायन्स कॉलेजसारख्या संस्थांच्या प्रगतीत त्यांचा वाटा राहिला आहे. या संस्थांतून घडलेले विद्यार्थी देश-विदेशात विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत. शिक्षणसंस्था म्हणजे केवळ पदवी देणारी यंत्रणा नव्हे, तर समाज घडविणारी केंद्रे असली पाहिजेत, या विचाराचा त्यांनी आग्रह धरला. डॉ. काब्दे यांना जवळून भेटण्याचा योग आलेल्या प्रत्येकाच्या आठवणीत त्यांच्या साधेपणाचा उल्लेख आवर्जून येतो. मराठवाडा जनता विकास परिषदेच्या कामाच्या निमित्ताने त्यांच्याशी संवाद साधताना जाणवणारी आपुलकी, छोट्या कार्यकर्त्यालाही दिलेले महत्त्व आणि प्रश्न समजून घेण्याची त्यांची पद्धत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी उंची दाखवते. माजी खासदार असूनही सामान्य कार्यकर्त्याशी ते सहजपणे संवाद साधतात. समोरच्याचे म्हणणे ऐकून घेतात. विकासाच्या प्रश्नांवर चर्चा करतात आणि काम करण्यासाठी प्रोत्साहन देतात. मोठेपणाचा हा विलक्षण विरोधाभास आहे. ज्याच्याकडे सांगण्यासारखे खूप काही असते, तोच माणूस समोरच्याचे ऐकण्यासाठी अधिक वेळ देतो.नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या अमृत महोत्सवी सांगता समारंभासाठी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधाताई पाटकर आल्या होत्या. मला पहिल्यांदा मेधाताई पाटकर यांना भेटण्याची व पीटीआय या वृत्तसंस्थेसाठी मुलाखत घेण्याची संधी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे सध्याचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील यांच्यामुळे मिळाली होती. मेधा पाटकर यांच्या मुलाखती दरम्यान डॉ. व्यंकटेश काब्दे तिथे होते. मुलाखत झाल्यानंतर त्यांनी माझ्याशी आवर्जून संवाद साधला. दरम्यान, पत्रकारिता आणि सामाजिक कार्याविषयी त्यांनी केलेले मार्गदर्शनही त्यांच्या विचारविश्वाची दिशा स्पष्ट करणारे आहे. मूल्यांशी तडजोड न करता काम करावे, समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न करावा, हा त्यांचा संदेश माझ्या मनाला भावणारा होता. त्यांनी माझा मोबाईल नंबर घेण्यासाठी स्वतःची डायरी काढली, हा साधा वाटणारा प्रसंगही त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील माणुसकीची उंची अधोरेखित करणारा ठरतो.

एका नामांकित शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राहिलेले डॉ. काब्दे साहेब आपल्या संस्थेतील एका शिक्षकाशी आपुलकीने आणि माणुसकीने संवाद साधतात हे आजच्या शिक्षण महर्षी म्हणून मिरवणाऱ्या आणि शिक्षक भरतीत करोडोचे डोनेशनचे आकडे मोजणाऱ्या संस्था चालकांनी आदर्श घेण्यासारखे आहे. कारण शेवटी माणसाची ओळख त्याच्या पदाने होत नाही. ती होते तो इतर माणसांशी कसा वागतो, समाजासाठी किती झटतो आणि स्वतःच्या विचारांशी किती प्रामाणिक राहतो, यावर.हृदयावर उपचार करणाऱ्या या डॉक्टरच्या मनात मात्र एक कवीही आहे. सामाजिक अस्वस्थता, माणसांविषयीची संवेदना आणि जगण्याकडे पाहण्याची चिकित्सक दृष्टी त्यांच्या कवितेतून व्यक्त होते. त्यामुळेच डॉ. काब्दे यांचे व्यक्तिमत्त्व वैद्यकीय क्षेत्रापुरते सीमित राहत नाही; ते सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि साहित्यिक विश्वालाही स्पर्श करते. स्वामी रामानंद तीर्थ आणि गोविंदभाई श्रॉफ यांच्या विचारांचा वारसा पुढे नेताना त्यांनी सेवा, साधेपणा, पारदर्शकता आणि सामाजिक बांधिलकी यांना आपल्या जीवनाचा आधार बनविला.त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा जीवनगौरव पुरस्कार, प्रमिलाताई भालेराव पुरस्कार, मुकुंदराज काव्यरत्न पुरस्कार यांसह विविध सन्मान त्यांना प्राप्त झाले. मात्र, पुरस्कारांपेक्षा त्यांच्या कार्यातून निर्माण झालेला विश्वास हीच त्यांच्या आयुष्याची खरी कमाई म्हणावी लागेल. डॉ. व्यंकटेश काब्दे म्हणजे एका व्यक्तीची कहाणी नाही; ती संघर्षातून उभ्या राहिलेल्या जिद्दीची, ज्ञानाला सामाजिक बांधिलकीची जोड देणाऱ्या विचारांची आणि पदापेक्षा माणुसकीला मोठे मानणाऱ्या जीवनमूल्यांची कहाणी आहे.

आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि अनेकदा मूल्यांपासून दुरावत चाललेल्या काळात त्यांचा प्रवास तरुणांसाठी एक शांत पण प्रभावी संदेश देतो. मोठे होण्यासाठी केवळ मोठे पद पुरेसे नसते; मोठे मन आणि समाजासाठी काही करण्याची तळमळही असावी लागते. आणि म्हणूनच डॉ. व्यंकटेश काब्दे यांचे व्यक्तिमत्त्व काळाच्या एका टप्प्यावर थांबत नाही; ते पुढच्या पिढीला सतत प्रश्न विचारत राहते. आपल्या ज्ञानाचा आणि क्षमतेचा उपयोग आपण केवळ स्वतःसाठी करणार, की समाजासाठीही? कुसुमाग्रजांच्या शब्दांत सांगायचे तर मोडून पडला संसार, तरी मोडला नाही कणा. डॉ. व्यंकटेश काब्दे यांच्या आयुष्याची कहाणीही याच कणखरपणाची मातीशी नाळ जोडून आकाशाएवढे कार्य उभे करणाऱ्या एका माणसाची.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# मुदखेड येथे मराठा समाजाचा रास्ता रोको



मुदखेड/प्रतिनिधी-मराठा आरक्षणाच्या विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणाला समर्थनात सकल मराठा समाजाच्यावतीने मुदखेड शहरातील शिवाजी चौकात रास्ता रोको आंदोलन केले. तसेच मुदखेड शहरातील बाजारपेठ कडकडीत बंद होती.

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी मुदखेड तालुक्यातील समाजबांधव शुक्रवारी मोठ्या संख्येने एकत्र जमा झाले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, तसेच मनोज जरांगे यांच्या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.रास्ता रोको आंदोलनामुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाकडून बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सकल मराठा समाजाच्या या आंदोलनाला शहरातील नागरिकांनीही प्रतिसाद दिला. सकल मराठा समाजाने पुकारलेल्या मुदखेड बंदलाही चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

# पहिले लग्न लपवून दुसरे लग्न;तीन लाखांसाठी सुनेचा छळ

## पतीसह २३ जणांवर गुन्हा दाखल

किनवट/प्रतिनिधी-पतीचे पहिले लग्न झाले असल्याची बाब लपवून ठेवले असून त्यात महिलेची फसवणूक झाल्याचे उशीरा कळाले. ट्रॅक्टर व जमिन सोडविण्यासाठी माहेरहून तीन लाख रुपये आणले नसल्याने सुनेचा शारीरिक-मानसिक छळ केल्याचा गंभीर आरोप करण्यात आलाय. प्रकरण एवढ्यावरच न थांबता सुनेसह नातीला घराबाहेर हाकलून देत जातीवाचक शिवीगाळ करून अपमानित केल्याप्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात पतीसह तब्बल २३ नातेवाईकांवर गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे किनवट तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे.

पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीत त्यांचा विवाह सन २०२० मध्ये बौद्ध पद्धतीने झाला होता. लग्नानंतर त्यांना एक मुलगी झाली. त्यानंतर त्या सासरी राहण्यास गेल्या असता, त्यांचे पती प्रभाकर व्यंकटी चव्हाण यांचे आधीच पहिले लग्न झाले असल्याचे महिलेच्या निदर्शनास आल्याचे त्यात नमूद आहे.पतीच्या नावावर असलेली जमीन व ट्रॅक्टर नातेवाईकांच्या नावावर झाल्याचे सांगत ते सोडविण्यासाठी माहेरहून ३ लाख रुपये पीडितेला सासरच्या मंडळींकडून सतत मारहाण, शिवीगाळ व मानसिक त्रास दिला. 'तू दुसऱ्या जातीची आहेस, इथून निघून जा' असे म्हणून त्यांना आणि त्यांच्या लहान मुलीस अमानुषपणे घरातून हाकलून देण्यात आल्याचा आरोप करण्यात आलाय.महिला सहाय्यक कक्ष (भरोसा सेल), पोलीस अधीक्षक कार्यालय नांदेड येथे बैठका होऊनही पती व सासरच्या मंडळींनी दाद न दिल्यामुळे अखेर पीडितेने किनवट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या तक्रारीवरून किनवट पोलिसांनी गुन्हा रजि. क्र.०२२७/२०२६ भारतीय न्याय संहिता, २०२ णीवांचा ८५ (पती किंवा नातेवाईकांकडून स्त्रीचा छळ), ११५ (२) (दुखापत पोहोचवणे), ३५२ (शांतता भंग करण्याचा हेतूने अपमान), ३ (५) (सामायिक हेतू).अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ (जातीवाचक शिवीगाळ व अत्याचार).अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणात शिरू पवार, अनिल भगवान चव्हाण, महेश रमेश कोमलवार, संतोष कऱ्हाळे, बंडूसिंग राठोड, पुष्पा बंडूसिंग राठोड, अरविंद विनायक चव्हाण, सुरेश मंशीराम राठोड, देविदास थारू राठोड, व्यंकटी रोहीदास चव्हाण, कमलबाई व्यंकटी चव्हाण, कविता दिलीप चव्हाण, दिलीप व्यंकटी चव्हाण, प्रतिक्षा प्रभाकर चव्हाण, विजय प्रभाकर चव्हाण, अजय प्रभाकर चव्हाण, नामदेव रोहीदास चव्हाण, किसन रोहीदास चव्हाण, भगवान रोहीदास चव्हाण, बालाजी नामदेव चव्हाण, शांताबाई नामदेव चव्हाण, प्रभाकर व्यंकटी चव्हाण (पती) आणि साहेबराव चव्हाण या सर्वांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम हे या प्रकरणाचा पुढील सखोल तपास करत असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# जुनी पेंन्शन समन्वय संघाच्या मूक मोर्चाला शिक्षक संघाचा पाठींबा

नांदेड/प्रतिनिधी-जुनी पेन्शन योजना लागू करावी या मागणीसाठी दि.५ सप्टेंबर रोजी मूक मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर काढण्यात येणार आहे. या मोर्चाला मराठवाडा शिक्षक संघ आंदोलनास सक्रिय पाठींबा दिला आहे.

सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव, सहसचिव रेखा सोळुंके, जिल्हाध्यक्ष व्यंकटराव चिलवरवार, सचिव आर. के. वाकोडे, ई. डी पाटोडदेकर, जी. पी. कौशल्य, आनंद मोरे आर पी वाघमारे, डी बी नाईक, राजेश कदम,बालाजी टीमकीकर, अब्दुल हसीब, जयवंत शिंदे, आनंद सुरसे, बाबाराव घाटे, यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# ज्योतीबा खराटे यांची मध्यस्थी;प्रशासनाच्या लेखी आश्वासनाने उपोषणाची सांगता

## आष्ट्याच्या विकासकामांवर प्रश्नचिन्ह,पाच वर्षांचे ऑडिट होणार

माहूर/प्रतिनिधी-आष्टा ग्रामपंचायतीतील सन २०२१ ते २०२५ या कालावधीत शासन तसेच ग्रामपंचायत निधीतून झालेल्या विविध विकासकामांच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या कामांची विशेष चौकशी, लेखापरीक्षण आणि योजनानिहाय संपूर्ण माहिती ग्रामस्थांना देण्यात यावी या मागणीसाठी आष्टा येथील आनंद कदम व भारत मुनेश्वर यांनी दि. १ सप्टेंबरपासून पंचायत समिती माहूरसमोर उपोषण सुरू केले होते. अखेर दि. ३ रोजी शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख ज्योतीबा खराटे यांच्या मध्यस्थीने प्रशासनाने लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषण स्थगित करण्यात आले.

आष्टा ग्रामपंचायतीच्या मागील पाच वर्षांतील विकासकामांचा कच्चा चिठ्ठा जनतेसमोर आणावा अशी उपोषणकर्त्यांची मागणी आहे. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या सर्व शासकीय योजनांचा योजनानिहाय संपूर्ण आराखडा ग्रामस्थांना लेखी स्वरूपात द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. यामध्ये प्रत्येक कामाचे नाव व ठिकाण, संबंधित योजना, मंजूर रक्कम, प्रत्यक्ष खर्च, काम सुरू व पूर्ण झाल्याची तारीख, कंत्राटदार अथवा एजन्सीचे नाव, अंदाजपत्रक, प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, मोजमाप पुस्तक क्रमांक, बिलाची रक्कम, देयकाची तारीख, कामाची सद्यस्थिती तसेच संबंधित लेखापरीक्षणातील आक्षेप यांची माहिती मागण्यात आली आहे. ग्रामपंचायतीच्या विकासकामांमध्ये पारदर्शकता असणे हा ग्रामस्थांचा अधिकार आहे. त्यामुळे केवळ कागदोपत्री चौकशी न करता प्रत्यक्ष कामांची पाहणी करून निधीचा हिशेब जनतेसमोर मांडावा अशी भूमिका उपोषणकर्त्यांनी घेतली.



गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस यांनी संबंधित मागण्यांबाबत चौकशी करण्याचे लेखी आश्वासन दिले. त्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी सहाय्यक गटविकास अधिकारी मुरादे, विस्तार अधिकारी रंजित लोखंडे, ग्रामसेवक यांच्यासह नामदेव कातले, अनिल रूणवाल, सुशील जाधव तसेच उपोषणकर्त्यांना पाठिंबा देण्यासाठी आष्टा येथील अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

# श्रावण सोमवारी देगलूर ते करडखेड पदयात्रा

देगलूर/प्रतिनिधी-श्रावण महिन्यातील सोमवारचे औचित्य साधून देगलूर ते करडखेड येथील जागृत श्री महादेव मंदिरापर्यंत भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, दि. ७ सप्टेंबर रोजी सकाळी ७ वाजता गांधी चौक येथील बंडयाप्पा मठ संस्थान येथून या पदयात्रेला प्रारंभ होणार आहे.

ही पदयात्रा देगलूरहून करडखेड येथील हेमाडपंथी स्थापत्यशैलीतील, जागृत व नवसाला पावणारे म्हणून भाविकांमध्ये श्रद्धास्थान असलेल्या श्री महादेव मंदिराकडे मार्गस्थ होणार आहे. श्रावण सोमवारच्या निमित्ताने महादेवाच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक सहभागी होण्याची अपेक्षा आहे. पदयात्रेदरम्यान भाविकांकडून भगवान महादेवाचा जयघोष करण्यात येणार असून, भक्तिमय वातावरणात ही पदयात्रा पार पडणार आहे. श्रद्धा आणि भक्तीचा संगम असलेल्या या पदयात्रेत परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पदयात्रेचे संयोजक संतोष पाटील गोजेगावकर यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

---

### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक - १६/०७/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार चंद्रकलाबाई लक्ष्मण डोनपले रा.हाळदा ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा चंद्रकलाबाई लक्ष्मण डोनपले रा.हाळदा ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव चंद्रकलाबाई लक्ष्मण डोनपले रा.हाळदा ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०१/०७/१९६५ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १५/०७/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- १६/०७/२०२६
स्थळ - कंधार

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

---

### जाहीर प्रगटन

नांदेड येथील ७ वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
श्री.एस.एम.कोळेकर यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१२४०/२०२६
धुरपताबाई भ्र.नागोराव आढाव, वय ६० वर्ष व्य.घरकाम,
रा.कासारखेडा, ता.जि.नांदेड ...अर्जदार
विरुध्द
निरंक

प्रकरण : कलम २७६ अंतर्गत नोंदणीकृत व्यक्तीच्या प्रोबेट मिळणेबाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात कलम २१३ अंतर्गत नोंदणीकृत मृत्यू पत्राच्या प्रोबेट उत्तराधिकार दिनांक २८.०७.२०२१ रोजीचे नोंदणीकृत मृत्युपत्र (will-deed) मुद्रांक पेपर क्रमांक वाय.एच. १३९३६२ नुसार मिळण्यासाठी अर्ज केला आहे. अर्जदार ही मयताची मुलगी आहे. मयत तातेराव रावजी उर्फ सावजी पावडे यांचा मृत्यू दिनांक १२/०९/२०२१ रोजी पुयणी, ता.जि.नांदेड येथे झाला आहे. अर्जदार ही मयताची उत्तराधिकारी आहे.

मिळकत क्रं.०१

पुयणी,ता.जि.नांदेड या गावची जमीन मिळकत ठिकाणचे नाव गट क्र.२५२ मधील एकूण क्षेत्र ० हे.३७ आर.आहे.

ह्या व्यतिरिक्त ज्या इतर अजून कुठल्याही वडिलोपार्जित मिळकती आहेत किंवा असतील ज्यात जो माझा हिस्सा आहे तो हिस्सा संपूर्ण पणे माझी मुलगी धुरपताबाई ह्यांना जाईल.

ह्या व्यतिरिक्त चल/अचल संपत्ती बँकेतील ठेवी, रक्कमा, सोने, चांदी अथवा इतर सर्व प्रकारचे सर्व संपत्ती वरती केवळ माझी मुलगी धुरपताबाई यांचा अधिकार राहील. इतर कोणाचेही हित संबंध राहणार नाही.

करीता अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात प्रोबेट मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे व नोटीसद्वारे आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे प्रोबेट देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी तो स्वतः न्यायालयात दिनांक ०८/०९/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा, मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ०२ माहे सप्टेंबर,२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय
व.स्तर,नांदेड

''आदेशावरुन''
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

---

### टी.सी.हरवली

माझी मुकनर बळीराम नरसिंग या नावाची ९ वी पासची टि.सी.व इतर कागदपत्रे वहाद ते कंधार बसने प्रवास करत असताना कंधार बसस्थानक परिसरात येथे हरवली आहेत. सापडल्यास संपर्क साधावा.

संपर्काचा पत्ता
**मुकनर बळीराम नरसिंग**
मु.वहाद ता.कंधार,जि.नांदेड.

---

### जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३१२/२०२६
(CNR No.MHND10-0001070-2026)

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | यशोदाबाई भारत जायभाये | वय-६८ वर्षे | धंदा-घरकाम |
| २ | सुरज पि.भारत जायभाये<br>दोघे रा.बोरी (खु) ता.कंधार जि.नांदेड | वय-२५ वर्षे | धंदा-नौकरी |

विरुद्ध गैरअर्जदार

प्रकरण - अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ चे पती अर्जदार क्र.२ चे वडील नामे भारत रामकिशन जायभाये हे होते. ते दिनांक २५/०२/२०२६ रोजी बोरी (खु) ता.कंधार जि.नांदेड येथे मृत्यु झाला आहे. अर्जदार क्र.१ यांची सासू व अर्जदार क्र.२ याची आजी नामे सारजाबाई रामकिशन जायभाये ह्या यापुर्वीच मयत झाल्या आहेत. अर्जदारांचे म्हणणे आहे की भारत रामकिशन जायभाये यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत भारत रामकिशन जायभाये यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत भारत रामकिशन जायभाये यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-३०/०९/२०२६

आज रोजी दि.२८/०८/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,
कंधार

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

---

### टी.सी.हरवली

अनुप नूरी पि.शेख मझरोद्दिन यांचा १२ वीचा मूळ शाळा सोडल्याचा दाखला (Original T.C.) शिवाजीनगर ते ITI परिसरा दरम्यान प्रवासा दरम्यान कुठेतरी हरवला आहे. हा दाखला (Original T.C.) कोणाला सापडल्यास कृपया ८७९३१९४४३२ या क्रमांकावर संपर्क साधावा. दाखला (Original T.C.) सापडवून देणाऱ्या व्यक्तीस योग्य इनाम बक्षीस दिले जाईल.

संपर्क
**अनम नूरी पि.शेख मझरोद्दिन,**
रा.मगदूम नगर, नई आबादी,नांदेड. मो.८७९३१९४४३२

---

### जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३१३/२०२६
(CNR No.MHND10-001071-2026)

अर्जदार - १. परविन बेगम भ्र.शेख याखुब वय - ७० वर्षे धंदा - घरकाम, २. शेख महेमुद पि.शेख याखुब वय-५० वर्षे धंदा - व्यापार, ३. यास्मीन बानु भ्र.सत्तारखान वय-४९ वर्षे धंदा-घरकाम रा.उस्मानपुरा जगतीयाल (तेलंगणा राज्य), ४. शेख कलीम पि.शेख याखुब वय-४६ वर्षे धंदा-व्यापार, ५.समीना बेगम भ्र.शेख इसहाक वय-४१ वर्षे धंदा-घरकाम उस्मानपुरा मालटेकडी रोड नांदेड जि. नांदेड, ६. शेख रुबिना भ्र.शेख ताहेर वय-४० वर्षे धंदा-घरकाम महेबुबिया कॉलनी नांदेड जि.नांदेड, ७. फरहिन भ्र.शेख इरशाद वय-३७ वर्षे धंदा-घरकाम अर्जदार क्र.१,२,४,७ रा.कोटबाजार ता. कंधार जि.नांदेड

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ चे पती व २ ते ७ चे वडील नामे शेख याखुब शेख जिवन हे होते, त्यांचा दिनांक १८/०६/२०२६ रोजी मृत्यु झाला आहे. अर्जदारांचे म्हणणे आहे की शेख याखुब शेख जिवन यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत शेख याखुब शेख जिवन यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत शेख याखुब शेख जिवन यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-३०/०९/२०२६

आज रोजी दि.०२/०९/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,
कंधार

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

---

### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक - २७/०८/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार बाळु यलप्पा दिंडे रा.खुड्याचीवाडी ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.जिवन बाळु दिंडे रा.खुड्याचीवाडी ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव जिवन बाळु दिंडे रा.खुड्याचीवाडी ता.कंधार या ठिकाणी दिनांक २०/११/२०१९ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १०/०८/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- २७/०८/२०२६
स्थळ - कंधार

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

---

### जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३१७/२०२६
(CNR No.MHND10-001082-2026)

अर्जदार - १. सविता शिवाजी रुंजे वय-५२ वर्षे धंदा-घरकाम, २. शामबाला पि.शिवाजी रुंजे वय-३३ वर्षे धंदा-घरकाम, ३. कोमल बालाजी मुतलताड वय-२९ वर्षे धंदा-घरकाम रा.नागटवाडी ता.चाकुर जि.लातुर, ४. अमोल पि.शिवाजीराव रुंजे वय-२८ वर्षे धंदा-खाजगी नौकरी, ५. स्वप्नील पि.शिवाजीराव रुंजे वय-२६ वर्षे धंदा-खाजगी नौकरी अर्जदार क्र.१, २ व ४, ५ रा.संगुची वाडी ता. कंधार जि.नांदेड

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ चे पती व २ ते ५ चे वडील नामे शिवाजी माणिकराव रुंजे हे होते, त्यांचा दिनांक २९/०३/२०२५ रोजी मृत्यु झाला आहे. अर्जदारांचे म्हणणे आहे की शिवाजी माणिकराव रुंजे यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत शिवाजी माणिकराव रुंजे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत शिवाजी माणिकराव रुंजे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-०३/१०/२०२६

आज रोजी दि.०२/०९/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,
कंधार

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

# मनोज जरांगे पाटलांच्या उपोषणाला पाठिंबा;धर्माबाद कडकडीत बंद

धर्माबाद/प्रतिनिधी-मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या सुरू असलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी धर्माबाद येथे सकल मराठा समाजाच्या वतीने पुकारण्यात आलेल्या बंदला व्यापारी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे.




मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी संपूर्ण शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. आंदोलकांनी आरक्षणाच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी करत संपूर्ण शहरातील मुख्य मार्गावरून मार्गक्रमण करीत संपूर्ण व्यावसायिक प्रतिष्ठाने बंद केली. सध्या संपूर्ण मराठवाड्यात जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचे तीव्र पडसाद उमटत आहेत. या पार्श्वभूमीवर धर्माबादमधील आजचा बंद पूर्णपणे यशस्वी आणि अत्यंत शांततेत पार पडला. शहरातील मुख्य बाजारपेठा आणि व्यावसायिक दुकाने बंद राहिल्याने या आंदोलनाला नागरिकांचा मोठा पाठिंबा असल्याचे दिसून आले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रशासनाच्या वतीने शहरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# मनोज जरांगेंच्या समर्थनार्थ देगलूर कडकडीत बंद

देगलूर/प्रतिनिधी-मराठा आरक्षणाच्या विविध मागण्यांसाठी अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने देगलूर शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. या बंदला व्यापारी, व्यावसायिक, युवक तसेच सकल मराठा समाजबांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपली एकजूट दाखवून दिली.

मराठा समाजाच्या आरक्षणासह कुणबी नोंदी, जात प्रमाणपत्रे आणि संबंधित मागण्यांवर शासनाने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलकांकडून करण्यात येत आहे. या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी देगलूरमध्ये बंदचे आवाहन करण्यात आले होते. या बंदला शहरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिल्याने नेहमी गजबजणारी बाजारपेठ शांत दिसून आली. सकल मराठा समाजाच्या आवाहनाला प्रतिसाद देत अनेक व्यापारी व व्यावसायिकांनी आपापली दुकाने स्वयंस्फूर्तीने बंद ठेवली. त्यामुळे शहरातील प्रमुख बाजारपेठांसह विविध व्यावसायिक भागांमध्ये दिवसभर शांतता पाहायला मिळाली. बंददरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी प्रशासन व पोलिसांकडून आवश्यक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यावेळी समाजबांधवांनी शांततेच्या



मार्गाने आपला निषेध नोंदवत शासनाने मराठा समाजाच्या मागण्यांकडे गांभीर्याने पाहावे, अशी भूमिका मांडली. देगलूर बंदमुळे प्रशासनाचेही लक्ष वेधले गेले असून, मराठा समाजाच्या मागण्यांची तीव्रता या बंदच्या माध्यमातून पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. मोठ्या संख्येने नागरिकांनी बंदमध्ये सहभाग घेतल्याने देगलूर शहरात मराठा समाजाची एकजूट आणि आंदोलनाला असलेला पाठिंबा स्पष्टपणे दिसून आला. दरम्यान, बंदच्या पार्श्वभूमीवर शहरातील परिस्थितीवर पोलिसांकडून लक्ष ठेवण्यात आले. बंद शांततेत पार पडावा यासाठी पोलिसांनी विविध ठिकाणी बंदोबस्त तैनात केला होता. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस प्रशिक्षणार्थी डीवायएसपी वैभव पडवळ यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# किनवट बंदला चांगला प्रतिसाद

किनवट/प्रतिनिधी-आंतरवाली सराटी येथे सुरू असलेल्या मराठा आरक्षणाला पाठिंबा देण्यासाठी किनवट येथील सकल मराठा समाजाच्या वतीने पुकारलेल्या बंदला चांगला प्रतिसाद मिळाला. ४ सप्टेंबर रोजी जिजामाता चौकात आरक्षण विषयक घोषणा देण्यात आल्या.




सकाळपासूनच शहरातील व्यापारी प्रतिष्ठाने आणि दुकाने कडकडीत बंद ठेवण्यात आली होती. बंद दरम्यान सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी गोकुंदा ते किनवट मोटारसायकल रॅली काढून सरकार विरोधी घोषणा देण्यात आल्या. बंद शांततेत पार पडावा यासाठी किनवटचे उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जगदीश मंडलवार आणि सहकाऱ्यांनी चोख पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.

# महिला भाविकांनी श्री भगोड साहिब गुरुद्वाराचे घेतले दर्शन

नांदेड/प्रतिनिधी- गुरुद्वारा प्रभागातील स्थानिक नगरसेविका मनप्रीत कौर अमरजीतसिंघ कुंजीवाले यांच्या वतीने यवतमाळ जिल्ह्यातील गुरुद्वारा श्री भगोड साहेबच्या दर्शनासाठी महिला भाविकांच्या विशेष यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या यात्रेत नांदेड येथील सुमारे २०० महिला भाविकांनी उत्साहाने सहभाग घेत गुरुद्वारा साहेबचे दर्शन घेतले.



दि. २ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता गुरुद्वारा महाकाल साहेब येथे अरदास करून भक्तिमय वातावरणात यात्रेला शुभारंभ करण्यात आला. बसने प्रवास करून सर्व भाविक गुरुद्वारा भगोड साहेब येथे पोहोचले. गुरुद्वारा दर्शनानंतर तिथे, गुरुबाणी, सुखमणी साहिब पाठ, कीर्तन, अरदास आणि लंगर प्रसादात सर्व भाविकांनी श्रद्धेने सहभाग घेतला. या यात्रेच्या माध्यमातून महिलांना एकत्र येऊन धार्मिक श्रद्धा, सेवा, प्रेम आणि बंधुभावाची भावना दृढ करण्याची सुंदर संधी मिळाली. सायंकाळी गुरुद्वारा भगोड साहेब येथून परतीच्या प्रवासाला सुरुवात झाली आणि रात्री ११ वाजता नांदेडला परतले. त्यानंतर सर्व प्रवासी महिलांचे कुंजीवाले मनप्रीत कौर अमरजीत सिंह यांच्या निवासस्थानी स्वागत करून त्यांना लंगर प्रसाद देण्यात आला. सर्वांच्या सहकार्याने आणि वाहेगुरुजींच्या आशीर्वादाने यात्रा आनंदात व यशस्वीपणे पूर्ण झाली.

# उपेक्षेचे ग्रहण सुटले;बोधडी (खु.) उपकेंद्रात आरोग्यसेवा सुरळीत

किनवट/प्रतिनिधी-बोधडी खुर्द येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांतर्गत सी.एच.ओं.सह चार आरोग्य कर्मचारी कार्यान्वित करण्यात आले असून आरोग्य सेवा बजावताना दिसतात. दररोज सकाळी तीन तास ओपीडी (बाह्यरुग्ण) सेवा चालू असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. सद्या पावसाळ्याचे दिवस असल्याने आरोग्य विभागाने सजग राहून सेवा देण्याची ग्रामस्थांनी अपेक्षा व्यक्तविलीय.

बोधडी बु. येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अधिपत्याखाली बोधडी खुर्द येथील आरोग्य उपकेंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. गावाची लोकसंख्या लक्षात घेता या उपकेंद्राची नितांत आवश्यकता होती. आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीची डागडुजी केल्यामुळे आता सेवा देण्यासाठी कसलीही अडचण येणार असल्याचे सांगण्यात येते. बोधडी बु. येथील डॉ. दस्तगीर आणि प्राथमिक आरोग्य केंद्र प्रशासनाचेही विशेष लक्ष असल्यामुळे सध्यातरी चांगल्या आरोग्य सेवेला सुरुवात झाली आहे. यापुर्वी एका अधिपरिचारीकेच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे आरोग्य सेवेचे तीनतेरा वाजवले होते. आता ग्रामस्थांच्या अथक प्रयत्नानंतर आणि स्थानिक प्रशासनाच्या सजगतेमुळे सुधारणा झाली असून नागरिकांना तुर्तासतरी गावातच आरोग्य सेवा देण्यासाठी सी.एच.ओ.डॉ. महेंद्र गोपने, ए.एन.एम.पंधरे, एन.आर.एच.एम.इसंबरे आणि एम.पी.डब्ल्यू. राहूल मेश्राम त्यांनी तत्परता दाखवल्यामुळे सकाळी तीन तास ओपीडी. चालवली जात असल्याचे सांगण्यात आले.

# नागपुरात डीजे बंदी,मात्र भाजपचाच विरोध

नागपूर:पुण्याच्या गणेशोत्सवात मागील आठवड्यापासून कर्णकर्कश डीजेला विरोध करण्यात येत आहे. पुण्यानंतर नागपुरातही डीजे बंदीची मागणी करण्यात आली. याचपार्श्वभूमीवर नागपूरचे पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील ६० दिवसांसाठी डीजे बंदी संदर्भातील अधिसूचना जारी केली. मात्र आता डीजे बंदीला भाजपचाच विरोध होत असून उद्या दहीहंडीनिमित्त डीजे वाजवण्यासाठी आयोजकही मुजोरी करताना दिसत आहेत. फक्त हिंदूंच्याच सणांच्या वेळेला डीजे बंदी का? असा प्रश्न मध्य नागपूरचे भाजप आमदार प्रवीण दटके यांनी विचारला आहे. तसेच पोलीस प्रशासनाने डीजे बंदी संदर्भात काढलेली अधिसूचना त्वरित मागे घ्यावी, अशी मागणी देखील त्यांनी केली आहे. तर दुसरीकडे डीजे बंदीवर बोलताना भाजप नागपूर शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी म्हणाले की, डीजेवर बंदी घालण्यापेक्षा आवाज डेसिबलच्या मर्यादा घालता आल्या असत्या. तसेच बंदी घालताना पोलीस आयुक्तांनी १ जानेवारी ते ३१ डिसेंबर अशी बंदी का घातली नाही? सनातनी धर्माचे सण असतानाच डीजे निर्बंध का? डीजे प्रतिबंधात वेगवेगळ्या शहरात वेगवेगळे नियम का? असे प्रश्न उपस्थित करत दयाशंकर तिवारी यांनी संपूर्ण राज्यात एकच नियम हवा, अशी मागणी केली.

# गोर बंजारा तीज महोत्सव:देगलूरात प्रथमच तीन मंत्र्यांची प्रमुख उपस्थिती राहणार

देगलूर/प्रतिनिधी-गोर बंजारा समाजाचा अत्यंत पवित्र आणि श्रद्धेचा सण मानल्या जाणाऱ्या 'तीज महोत्सवा'चे यंदा देगलूर येथे भव्य दिव्य आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या तीज महोत्सवाच्या इतिहासात प्रथमच तीन मंत्री एकाच मंचावर उपस्थित राहणार असल्याने, यंदाचा उत्सव ऐतिहासिक ठरणार आहे.



हा भव्य सोहळा रविवार, दि.२० सप्टेंबर रोजी देगलूर येथील सेवालाल महाराज चौक येथे थाटामाटात पार पडणार आहे. या कार्यक्रमासाठी मा.ना.संजय राठोड (कॅबिनेट मंत्री), मा.ना.इंद्रनील नाईक (राज्यमंत्री), मा.ना.सौ.मेघनाताई बोर्डीकर(राज्यमंत्री) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. गोर बंजारा संस्कृतीचे जतन आणि संवर्धन व्हावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात देगलूरसह संपूर्ण जिल्ह्यातून आणि परिसरातून हजारोंच्या संख्येने बंजारा बांधव व भगिनी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती मुख्य संयोजक विशाल पवार यांनी दिली.बंजारा समाजातील पारंपरिक वेशभूषा, तीजची गाणी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल या सोहळ्यात पाहायला मिळणार आहे. या अभूतपूर्व आणि ऐतिहासिक सोहळ्याचा साक्षीदार होण्यासाठी गोर बंजारा समाजातील सर्व बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजन व संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. या उत्सवाचे महोदयांना निमंत्रण देताना रामराव चव्हाण, बालाजी जाधव, सचिन जाधव, अनिल राठोड, गणेश पवार, संतोष पवार, संजय राठोड हे उपस्थित होते.

# दसरा-दिवाळीत साखरेचा भाव आणखी उतरणार

मुंबई/प्रतिनिधी-गणेश चतुर्दशी, नवरात्री, दसरा, दिवाळी आणि छठ यांसारख्या आगामी सणांमुळे साखरेच्या दरात आणखी घट होण्याची आशा व्यक्त केली जात आहे. अन्न व सार्वजनिक वितरण विभागाने 'X' वर पोस्ट करून साखरेबाबत माहिती दिली आहे. 'X' वर केलेल्या पोस्टनुसार, देशातील किरकोळ बाजारात साखरेची किंमत सुमारे ५ टक्क्यांनी कमी झाली आहे. यापूर्वी साखरेच्या एक्स-मिल दरात सुमारे २० टक्क्यांची मोठी घसरण झाली असल्याची माहिती दिली आहे. साखरेच्या बाजरातील आकडेवारीनुसार, गुरुवारी संध्याकाळी आलेल्या दरांनुसार साखरेचे भाव ६१ रुपये प्रति किलोवर पोहोचले आहेत. ३ सप्टेंबर रोजी दिल्ली, हैदराबाद, कोलकाता आणि रांचीमध्ये साखर ६१ रुपये प्रति किलो दराने विकली गेली होती. गुवाहाटी, कानपूर आणि रायपूरमध्ये ती ६२ रुपये प्रति किलो, तर चेन्नईमध्ये ६३ रुपये प्रति किलो इतका दर होता.सरकारच्या म्हणण्यानुसार, एक्स-मिलमधील घसरलेल्या दरांचा परिणाम किरकोळ बाजारात हळूहळू दिसू लागला आहे.

# खरबी येथील जनावरे चोरी करणाऱ्या आरोपीस अटक

उमरखेड/प्रतिनिधी-तालुक्यातील खरबी येथून चोरीला गेलेल्या दोन म्हशी व एका वासराचा छडा लावण्यात दराटी पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी एका आरोपीला ताब्यात घेतले असून, चोरीला गेलेली सर्व जनावरे हस्तगत केली आहेत.

फिर्यादी शेतकरी सदानंद नारायण पांडे रा. खरबी यांच्या मालकीच्या दोन म्हशी आणि एक वासरू त्यांचा गडी ३० ऑगस्ट रोजी दुपारी गावालगतच्या पैनगंगा नदीपात्राजवळील जंगल परिसरात चारण्यासाठी घेऊन गेला होता. जंगलात चरत असताना अचानक दोन म्हशी व एक वासरू बेपत्ता झाल्याचे गड्याच्या लक्षात आले. त्याने जंगल परिसरात शोध घेतला, तसेच पांडे यांनी गावातील नागरिकांच्या मदतीने खरबी शिवार, जंगल आणि पैनगंगेच्या दोन्ही काठांवर शोधमोहीम राबवली, मात्र जनावरे मिळून आली नाहीत.अखेर कोणीतरी अज्ञात व्यक्तीने आर्थिक फायद्यासाठी जनावरे चोरून नेल्याचा संशय व्यक्त करत सदानंद पांडे यांनी दराटी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार दोन म्हशींची प्रत्येकी ४० हजार तर वासराची ५ हजार अशा एकूण ८५ हजार रुपयांचे नुकसान झाले होते.तक्रार दाखल होताच दराटी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. परिसरातील गुराखी व नागरिकांकडून गोपनीय माहिती गोळा करण्यासोबतच तांत्रिक तपासाचा आधार घेण्यात आला. तपासात संतोष शिवाजी मुंडे, सध्या रा.गोकुंद्रा, ता.किनवट आरोपीने चोरी केलेली जनावरे विक्री करण्याच्या उद्देशाने आपल्या एका नातेवाईकाकडे लपवून ठेवल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. मालकाने आपल्या जनावरांची ओळख पटवताच पोलिसांनी दोन्ही म्हशी व वासरू ताब्यात घेतले आणि आरोपी संतोष मुंडे याला अटक केली.ही यशस्वी कारवाई ठाणेदार गोपाळ इंद्राळे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार गजानन डोंगरे यांनी केली. या प्रकरणाचा पुढील तपास दराटी पोलीस करीत आहेत.

पान १ वरुन

## भावना दुखावल्याप्रकरणी...

जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. गणेशोत्सवातील ध्वनीप्रदूषणा विरोधातील आपला लढा सुरूच राहणार असून सार्वजनिक ठिकाणी उत्सव साजरा करताना ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे पालन झाले पाहिजे, अशी भूमिका बापट यांनी पुन्हा स्पष्ट केली. त्यांच्या या भूमिकेमुळे पुण्यात गणेशोत्सवातील ध्वनीप्रदूषणाचा मुद्दा आणखी चिघळण्याची शक्यता आहे.

## आश्रमशाळेतील आणखी एका...

सवाल तिच्या पालकांकडून उपस्थित करण्यात आला आहे. तसेच आश्रमशाळेत असताना सृष्टीवर कोणते उपचार करण्यात आले, तिला रुग्णालयात दाखल करण्यास विलंब झाला का, याचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.सृष्टीच्या मृत्यूमागील नेमके कारण स्पष्ट होण्यासाठी प्रशासनाने सखोल चौकशी करावी आणि संपूर्ण वस्तुस्थिती पालकांसमोर आणावी, अशी मागणी होत आहे. आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आवश्यक सुविधा आणि तत्काळ वैद्यकीय मदत उपलब्ध आहे की नाही, याबाबतही आता प्रश्न निर्माण झाले आहेत.दरम्यान, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळवणच्या प्रकल्प अधिकारी डॉ. कश्मिरा संखे यांनी या घटनेबाबत माहिती देताना सांगितले की, सृष्टीला ३ सप्टेंबर रोजी ताप आला होता. त्यानंतर तिला तातडीने दवाखान्यात दाखल करून उपचार करण्यात आले. मात्र उपचारानंतर तिला उलट्यांचा त्रास झाला. सायंकाळी पुन्हा उलट्या होण्याबरोबरच तापही वाढला. तिची प्रकृती पाहता तिला रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले; मात्र रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच तिचा मृत्यू झाला.सृष्टीवर वेळोवेळी उपचार करण्यात आले असतानाही तिचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. त्यामुळे मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून, शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती डॉ. संखे यांनी दिली.गडचिरोलीतील आश्रमशाळेतील विद्यार्थिनींच्या मृत्यूच्या घटनेनंतर आश्रमशाळांमधील आरोग्य आणि सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असतानाच कळवण येथील या घटनेने पुन्हा एकदा आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या आरोग्य व्यवस्थेची प्रभावी तपासणी करण्याची गरज अधोरेखित केली आहे.

# नायगाव येथे बंद तर राहेर,गडगा येथे रास्ता रोको

नायगाव प्रतिनिधी-नायगाव तालुक्यातील राहेर व गडगा येथे मनोज जरांगे यांच्या सुरू असलेल्या उपोषणाची शासनाने तातडीने दखल घ्यावी, या मागणीसाठी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. तर नायगाव येथे व्यापाऱ्यांनी बाजारपेठ बंद ठेवल्यामुळे रेलचेल मात्र कमी झाल्याचे पहावयास मिळाले.






राहेर व गडगा येथे करण्यात आलेल्या रास्ता रोको आंदोलनामुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला होता. मनोज जरांगे यांच्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मराठा समाज बांधवांनी एकत्र येत आंदोलन केले. शासनाने या मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलकांकडून करण्यात आली. दरम्यान, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर नायगावसह मांजरम व अन्य ठिकाणी बाजारपेठा बंद ठेवण्यात आल्या. बाजारपेठा बंद असल्याने परिसरातील दैनंदिन व्यवहारांवरही परिणाम झाला. राहेर व गडगा येथील रास्ता रोको आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. नायगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विजय जाधव आणि कुंटूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४